# देवघर आणि पूजेतील उपकरणे ( शास्त्रीय महत्त्व आणि मांडणी )

## अनुक्रमणिका

**( काही वैशिष्ट्यपूर्ण सूत्रे ( मुद्दे.) '*' या चिन्हाने दर्शवली आहेत. )**


**- मनोगत**

१. देवघर कोणत्या दिशेला असावे ?

२. देवघराचे स्वरूप कसे असावे ?

३. देवघरात देवतांची मांडणी कशी करावी ?

४. पूजेची उपकरणे कोणत्या धातूंपासून बनवलेली असावीत ?

५. देवपूजेसाठी जुनी उपकरणे का वापरावीत ?

६. देवपूजेत वापरल्या जाणाऱ्या उपकरणांचे अध्यात्मशास्त्रीय महत्त्व

७. देवपूजेतील घटक नि उपकरणे यांची मांडणी

# मनोगत

ईश्वरप्राप्तीसाठी भक्तीमार्गाने उपासना करणाऱ्यांच्या दृष्टीने एक महत्त्वाचा उपासनाप्रकार म्हणजे देवपूजा. देवपूजा म्हटली की, घरात देवघर असणे क्रमप्राप्तच आहे. आजकाल बहुतेकांच्या घरी सोयीनुसार अथवा घराचा एक दर्शनीय भाग म्हणून देवघर बनवले जाते. देवघर बनवण्यामागे शास्त्रीय दृष्टीकोन काय असावा, याचा विचार विशेषकरून होत नाही. अध्यात्मातील प्रत्येक कृती विशिष्ट प्रकारे करण्याच्या वा होण्याच्या मागे काहीतरी शास्त्र असते. अर्थात प्रत्येक कृती शास्त्रानुसार केल्यासच त्या कृतीतून मिळणारा आध्यात्मिक लाभ जास्त असतो. याच हेतूने प्रस्तूत लघुग्रंथात देवघर कोणत्या दिशेला असावे, देवघराचा रंग, रूप आणि आकार कसा असावा, देवघरातील देवतांची मांडणी कशा प्रकारे करावी इत्यादींविषयी अध्यात्मशास्त्रीय ज्ञान दिले आहे.

ताम्हण, पूजेचे तबक, निरांजन, घंटी, समया आदी उपकरणे ही पूजाविधीतून देवतेची कृपा प्राप्त होण्यातील महत्त्वाचा दुवा आहेत. देवपूजा आरंभ करण्याआधी या उपकरणांची मांडणी विशिष्ट पद्धतीने केल्यास, नंतर पूजाविधीतून देवतेच्या तत्त्वाचा लाभ जास्त प्रमाणात का आणि कसा मिळतो, याचेही अध्यात्मशास्त्रीय विश्लेषण या लघुग्रंथात दिले आहे. देवपूजेच्या उपकरणांचे महत्त्व जाणून घेतल्यास त्यांच्याप्रती भाव निर्माण व्हायला साहाय्य होते. देवपूजा भावपूर्ण झाल्यास देवतेच्या तत्त्वाचा लाभ अधिक मिळतो. यासाठी या लघुग्रंथात देवपूजेच्या उपकरणांचे अध्यात्मशास्त्रीय महत्त्व आणि वैशिष्ट्येही दिली आहेत.

या लघुग्रंथात दिलेले शास्त्र समजून घेऊन कृती करणाऱ्यास ईश्वरी तत्त्वाचा अधिकाधिक लाभ मिळो, ही श्री गुरुचरणी प्रार्थना. – **संकलक**